# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

# इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, वर्धा

**वर्ग : बी.ए. प्रथम दोन**

**विषय : मराठी साहित्य**

## प्रश्नपत्रिका

---

1. नाटक या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप व वैशिष्ट्ये विशद करा.

**किंवा**

'नटसम्राट' या नाटकातील कावेरीचे व्यक्तिचित्र रेखाटा. **16**

2. नाटकाचे संहितानिष्ठ घटक व सादरीकरणाचे घटक कोणकोणते आहेत?

**किंवा**

'नटसम्राट' या नाटकाची शैली व वैशिष्ट्ये विशद करा. **16**

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील अवतरणांचे संदर्भासह अर्थ स्पष्ट करा.

**गट 'अ'**

(क) ''पन्नास वर्षे तुम्ही तापलेल्या तव्याबरोबर संसार केला आहे!''

(ख) ''अरे, तुमच्यासारखे नवरे म्हणजे बायकांनी कमरेला खोचलेले हातरूमाल!''

(ग) ''ही माणसं जगणं अस करतात म्हणून नंदानं लिहिलं होतं ते काही खोटं नाही.''

(घ) ''बाबा, तुला तुझ्या पोरांनी टाकलं, मला माझ्या आईबापांनी टाकलं.''

**किंवा**

**गट 'ब'**

(च) ''अगं, माणसाच्या प्रेमासारखं दुसरं टॉनिक नाही जगात.''

(छ) ''हे काय घर आहे की नाटकमंडळीतल्या उडाणटप्पू लोकांची धर्मशाळा आहे !''

(ज) ''बायको हे एक बंदर असतं कावेरी नावाच्या गलबतासाठी.''

(झ) ''बाबा, हे साले गुबगुबीत घरात राहतात कबुतरांसारखे, आणि आम्ही रस्त्यावर टेकलो तर आम्हाला लाथा मारायला येतात.'' **16**

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची थोडक्यात उत्तर लिहा :

**गट 'क'**

(त) होमरच्या 'इलियड' आणि 'महाभारतातील'संग्रामाचे स्वरूप लिहा.

(थ) ललितकथा वाचनामागे वाचकांच्या कोणत्या अपेक्षा असतात?

(द) व्यक्तिदर्शनप्रधान कादंबऱ्या अधिक श्रेष्ठ का समजल्या जातात?

(ध) व्यक्तिदर्शनाच्या आधारावाचून निर्मिलेला प्रसंग पोकळ डोलाऱ्याप्रमाणे असतो, स्पष्ट करा.

**किंवा**

**गट 'ड'**

(प) अमूर्त व सूक्ष्म संग्रामाची कोणती उदाहरणे ना.सी. फडके यांनी दिली आहेत?

(फ) कोणत्या कल्पनेने माणसास विलक्षण आल्हाद वाटतो?

(ब) ललित लेखकाला कशाचा सराव अधिक करण्याचा सल्ला ना.सी. फडके यांनी दिला आहे?

(भ) कथारचना चातुर्यापेक्षा व्यक्तिदर्शन चातुर्य दसपटींनी अधिक महत्त्वाचे का समजले जाते? **16**

5. खालीलपैकी **सर्व** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :—

(1) अप्पासाहेब बेलवलकरांनी आपली संपत्ती कुणाला वाटून दिली?

(2) शारदा ठमीवर कशासाठी व का बंधने घालते?

(3) अप्पासाहेब बेलवलकर कळवणकर साहेबांना 'चालते व्हा' असे का म्हणतात?

(4) घरातून निघून गेलेले अप्पासाहेब मुंबईत कोणत्या ठिकाणी व कुणाजवळ राहतात?

(5) संग्रामाच्या कोणत्या गोष्टी ऐकण्यात मनुष्याला विलक्षण आनंद मिळतो?

(6) लोकांचे चित्त वेधण्याची शक्ती ललितकथेत कशी निर्माण होते?

(7) कथेच्या कृतीचा परिणाम वाचकांवर केव्हा होतो?

(8) 'गड आला पण सिंह गेला' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखांची नावे सांगा. **16**